# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 15.07.2025** **वार-मंगळवार**

---

**<u>घन कचरा व्यवस्थापन निविदा</u>**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्था पनाशी संबंधित निविदा प्रक्रिया ५ ते ७ टक्के जास्त दराने झाल्याचे आढळून आल्याने ती संपूर्ण प्रक्रिया रद्द करण्यात आली असल्याची माहिती राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी काल विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. याबाबत सदस्य भीमराव तापकीर यांनी प्रश्न उपस्थित केला होता.

शासनाने महानगरपालिकेला या निविदा प्रक्रियेची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्या अनुषंगाने महानगरपालिकेने या निविदा रद्द केली असल्याचं मिसाळ यांनी सांगितलं. संबंधित प्रकरणांमध्ये चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

**<u>निवडणूक आराखडा</u>**

पुणे जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी 73 गट आणि 146 गणांची रचनेचा प्रारूप आराखडा काल प्रसिद्ध करण्यात आला. त्यानुसार जुन्नर, खेड आणि इंदापूर या तालुक्यांमध्ये जिल्हा परिषद सदस्य संख्या प्रत्येकी आठ असणार आहे, तर सर्वांत कमी, 2 सदस्य संख्या राजगड

वेल्हा तालुक्यासाठी निश्चित केली आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी गट-गण रचनेची अधिसूचना सोमवारी काल जारी केली. या रचनेसाठी 2011ची जनगणना ग्राह्य धरण्यात आली आहे. याबाबत नागरिकांना 21 जुलैपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांकडे हरकती, सूचना नोंदविता येणार आहे.

**डेंग्यू मलेरिया अटकाव**

पिंपरी चिंचवड शहरात डेंग्यू, मलेरिया यांसारख्या डासजन्य आजारांना अटकाव करण्यासाठी महापालिकेने आक्रमक पावले उचलली आहेत. औषध फवारणीपासून ते थेट दंडात्मक कारवाईपर्यंत आरोग्य विभागाकडून विविध उपाययोजना राबवण्यात येत आहेत.

घरगुती पातळीपासून औद्योगिक आणि बांधकाम स्थळांपर्यंत सखोल तपासण्या सुरू आहेत, आठ ही क्षेत्रीय कार्यालयांतर्गत ही कारवाई करण्यात येत आहे.

**लष्करभाग चोरी**

पुणे शहरातील सर्वात सुरक्षित समजल्या जाणाऱ्या लष्करी अधिकाऱ्यांची वसाहत असलेल्या असलेल्या वानवडी भागात एका लष्करी अधिकाऱ्याच्या घरात दोघा चोरट्यांनी दरोडा टाकल्याचा प्रकार समोर आला आहे. चोरट्यांनी ४० तोळे सोन्याच्या दागिन्यांसह साडेआठ लाखांचा ऐवज चोरुन नेला आहे. पोलीस याचा अधिक तपास करत आहेत.

**लम्पी लागण**

पुण्यासह राज्यात गोवर्गीय पशुधनाला लम्पीची लागण झाल्याचे आढळून आले आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मार्गदर्शक सूचना जारी केल्या असून पशुपालकांनी आपल्या पशुधनास लस टोचून घ्यावी, तसेच  प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, असं आवाहन केलं आहे. रोग नमुने गोळा

करण्याकरिता पशुसंवर्धन आयुक्तांना सर्वेक्षणाच्या सूचना दिल्या आहेत.  मे महिन्यात पडलेल्या पावसानंतर वाढलेल्या डास, माशांमुळे लम्पीची लागण झाली होती.

**शिवसृष्टी सवलत**

पुण्यातील आंबेगाव इथल्या शिवसृष्टी प्रकल्पाला गेल्या दोन महिन्यात मिळालेल्या प्रतिसादानंतर तिकीटदरातील सवलत आता १५ ऑगस्टपर्यंत वाढविण्यात आल्याची  माहिती महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानचे विश्वस्त आणि शिवसृष्टी प्रकल्पाचे अध्यक्ष जगदीश कदम यांनी दिली आहे. कदम म्हणाले, ‘‘महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानातर्फे साकारलेला शिवसृष्टी हा प्रकल्प जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचावा या हेतूने अभय भुतडा फाउंडेशनतर्फे प्रतिष्ठानला ५१ लाखांचा निधी सुपूर्त केला असून प्रतिव्यक्ती ५० रुपये दरामध्ये नागरिकांना शिवसृष्टीला भेट देता येणार आहे.

**वैष्णवी हगवणे**

वैष्णवी हगवणे प्रकरणी पोलिसांनी पुणे जिल्हा सत्र न्यायालयात 1670 पानाचं दोषारोपपत्र केलं दाखल आहे. दोषारोप पत्रात एकूण 11 जणांवर आरोप ठेवण्यात आला आहे. यापैकी पाच आरोपी न्यायालयीन कोठडीत तर सहा आरोपी जामिनावर बाहेर आहेत. निलेश चव्हाण याच्यावर  देखील आरोप ठेवण्यात आला आहे.

**बिलीयर्डस् आणि स्नुकर**

बाहरीन  इथं आंतरराष्ट्रीय बिलीयर्डस् आणि स्नुकर फेडरेशनतर्फे आजपासून आयबीएसएफ जागतिक १७ आणि २१ वर्षाखालील स्नुकर अजिंक्यपद स्पर्धा सुरू झाल्या आहेत.  या स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या भारतीय संघामध्ये पुण्याच्या आरव संचेतीचा सहभाग आहे. भारतीय संघामध्ये निवड झालेला 14 वर्षीय आरव हा महाराष्ट्रातील एकमेव खेळाडू असून तो संघातील सर्वात लहान खेळाडू आहे.  भारतीय  सब-ज्युनिअर २०२४ स्नुकर आणि बिलीयर्डस् गटात आरवला अव्वल मानांकन आहे.

**<u>पवनाधरण पाणीसाठा</u>**

पिंपरी चिंचवड शहराला पाणी पुरवठा करणारे पवना धरण 77 पूर्णांक 80 टक्के भरले आहे. पाणलोट क्षेत्रात पाऊस चालूच असून धरणामध्ये  मोठ्या प्रमाणावर पाणी येत आहे.

हा पाणीसाठा नियंत्रित करण्याकरिता आज सांडव्याद्वारे नदीपात्रामध्ये 2050 क्युसेक्स विसर्ग करण्यात येत आहे.

दरम्यान खडकवासला धरण साखळी क्षेत्रातही जोरदार पाऊस झाल्याने धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सोडण्यात येण्याची शक्यता आहे त्यामुळे नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज दिवसभर ढगाळ वातावरण असून सकाळी पावसाच्या जोरदार सरी बरसल्या. पुणे जिल्हा आणि घाट क्षेत्रात मुसळधार पावसाचा इशारा पुणे वेधशाळेने दिला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**